महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# जाहीर सुचना

अउदा संवसु विभाग महापारेषण बुलडाणा अंतर्गत शिकाऊ उमेदवारी १९६१ नुसार आय. टी. आय विजतंत्री (**Electrician**) शिकाऊ उमेदवारी (**Apprenticeship**) अर्ज वर्ष २०२२-२०२३ या सत्राकरिता शिकाऊ उमेदवारांची (**Apprenticeship**) एक वर्ष कालावधीसाठी प्रशिक्षणाकरिता भरती घेण्यात येत आहे. करिता खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीना अधीन राहुन इच्छुक पात्र विद्यार्थी/उमेदवारांनी दिनांक २०/०७/२०२२ चे रात्री २३:५९ वाजेपर्यंत **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर आस्थापना क्रमांक **E05202700961** वर नोंदणी करुन ऑनलाईन अर्ज सादर करावे. तसेच ऑनलाईन नोंदणी केलेल्या अर्जाचा Screen Short/ Print काढुन महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या जाहीराती सोबत जोडलेल्या फॉर्मसह खालील नमुद केलेल्या पत्त्यावर संपुर्ण कागदपत्रांसहीत टपालाव्दारे दिनांक ३०/०७/२०२२ पर्यंत पाठवावेत.

१. उमेदवार/प्रशिक्षणार्थी/आरक्षण टक्केवारी खालील प्रमाणे.

| विभागांचे नावे | एकुण जागा | अ.जा १३ % | अ.ज ७% | विजाअ ३ % | भजब २.५०% | भजक ३.५०% | भजड २ % | विमाप्र २ % | इमाव १९ % | ई डब्लु एस १० % | खुला ३८% | एकुण १०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अउदा संवुस विभाग, बुलडाणा | २१ | २ | १ | १ | १ | १ | १ | ० | ४ | २ | ८ | २१ |

२. ऑनलाईन नोंदणी/अर्ज करण्याची अंतिम दिनांक २०/०७/२०२२ चे रात्री २३:५९ वाजेपर्यंत राहील.

३. वरील प्रमाणे अर्ज करणा-या उमेदवारांनी सदर अर्जाचा Screen Short/Print सहित जाहिराती सोबत जोडलेल्या फॉर्ममध्ये अचुक माहिती भरुन त्यांच्याशी संबधित दस्ताऐवज **कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु विभाग, म. रा. वि. पा. कं. मर्या, विद्युत भवन मागे, चिखली रोड, बुलडाणा -४४३००१ या** पत्त्यावर पाठवावेत (कंपनीच्या धोरणानुसार आरक्षण अंमलबलजावणीसाठी आवश्यक)

**यासाठी खालील नमुद केलेले दस्ताऐवज आवश्यक असतील.**

अ. **www. apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर उमेदवाराची प्रशिक्षणार्थी उमेदवार म्हणुन नोंद असणे आवश्यक आहे.
ब. जन्म तारेखेसाठी १० वी ची सनद /शाळा सोडल्याचा दाखला आवश्यक
क. इयत्ता दहावीचे गुणपत्रक
ख. आ. टी. आय वीजतंत्री गुणपत्रक (Electrician) (चारही सत्र/वार्षिक )
ग. आधार कार्ड
घ. अर्जदार/उमेदवार मागासवर्गीय असल्यास जात प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र.
च. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (ईडब्लुएस) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:राआधो-४०१९/प्र.क्रं.३१/१६ अ,दि.१२ फेब्रुवारी, २०१९ व दि. ३१ मे ,२०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र, ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.
छ. अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र/आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणुन सक्षम प्राधिका-याने वितरित केलेले प्रमाणपत्र अर्ज सदर करण्याच्या अंतिम दिनांकास वैद्य असणे आवश्यक आहे.
ज. महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled Certificate) असल्याबाबतचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

**वरील सर्व कागदपत्रांच्या प्रती स्वसाक्षांकित असाव्यात.**

४. यापुर्वी शिकाऊ उमेदवारी केलेली नसावी.

५. दि. २०/०७/२०२२ रोजी किमान १८ वर्ष पुर्ण/कमाल ३८ वर्ष (मागासवर्गीय/आर्थिक दुर्बल घटक यांना ५ वर्ष शिथीलक्षम)

६. सदर भरतीकरिता महापारेषण कंपनीचे संबंधित सर्व परिपत्रक, अटी व शर्ती, नियम व अटी लागु राहतील व अधिक माहितीसाठी **www.mahatransco.in** संकेतस्थळावर **Career** या सदराखाली जाहिरात पाहावी, तसचे सदर भरती प्रक्रियेमध्ये वेळोवेळी या पुढे होणारे बदल हे महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

७. उमेदवारांची निवड त्यांचे एस. एस. सी. तसेच आय. टी. आय. (वीजतंत्री) एकत्रित टक्केवारीच्या सरासरीच्या आधारे होईल व मौखीक चाचणी घेतली जाणार नाही किंवा मौखीक चाचणीचे कोणतेही गुण ग्राह्या धरण्यात येणार नाही.

८. वरील प्रमाणे नमुद अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

९. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**टिप :- फक्त ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेद्वारांचे टपालाव्दारे विहीत कालावधीत प्राप्त झालेले अर्ज / प्रत्यक्ष आलेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील यांची सर्वानी नोंद घ्यावी.**

**(विनोद ज. हुंबर्डे)**
**कार्यकारी अभियंता,**
**अउदा संवसु विभाग,बुलडाणा.**

# शिकाऊ उमेदवार भरती करिता अनुसरित येणारी पध्दत व अटी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | कार्यालयाचे नावं | :- | कार्यकारी अभियंता, अउदा (संवसु) विभाग, विद्युत भवन मागे, चिखली रोड, बुलडाणा-४४३००१ |
| २ | मागणी करणारे अधिकारी यांचे पदनाम | :- | कार्यकारी अभियंता |
| ३ | निवड पध्दत | :- | गुणवत्तेनुसार |
| ४ | क) भरावयाच्या पदाचे नांव व संख्या | :- | वीजतंत्री ( शिकाऊ उमेदवार ) **(Apprenticeship)** पदसंख्या २१ |
| | ख) शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी | :- | वीजतंत्री-१ वर्ष |
| | ग) विद्या वेतन | | शासकीय धोरणानुसार |
| ५ | शैक्षिणीक अर्हता | १ | इयत्ता १० उत्तीर्ण व |
| | | २ | राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (एन. सी. टी. व्ही. टी) नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यताप्राप्त शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन आय. टी. आय दोन वर्ष वीजतंत्री (Electrician ) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक |
| ६ | राखीव पदे | :- | कंपनीच्या धोरणानुसार |
| ७ | भरती प्रक्रिया पुढील प्रमाणे राबविण्यात येईल. | १ | जे उमेदवार www. apprenticeshipindia या संकेत स्थळावर अर्ज करतील त्यांनी त्या अर्जाचा Screen Short/ Print काढुन जाहिरातीसोबत जोडलेल्या फॉर्मसह नमुद कार्यालयीन पत्त्यावर आवश्यक त्या दस्तऐवजास पाठवावे |
| | | २ | लगतच्या रकान्यात नमुद असल्यानुसार दोन्ही स्वरुपात अर्ज सादर करणा-यांचेच अर्ज विचारात घेतले जातील. |
| | | ३ | आय. टी. आय व एस. एस. सी उत्तीर्ण गुणांच्या आधारेच गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. |
| | | ४ | कंपनीच्या विहीत तरतुदी व आरक्षणानुसार निवड यादी तयार केली जाईल. एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते गुणवत्तेनुसार प्रवर्गाचा विचार न करता भरले जाईल. |
| | | ५ | निवड केलेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडुन वैद्यकीय चाचणी करुन घेणे बंधनकारक राहील. |
| | | ६ | कॉन्ट्रक्ट रजिस्ट्रेशन झाल्याशिवाय कोणताही उमेदवार शिकाऊ उमेदवारीस पात्र ठरणार नाही. |
| ८ | वयोमर्यादा | :- | दि. २०/०७/२०२२ रोजी किमान १८ वर्ष पुर्ण/कमाल ३८ वर्ष (मागासवर्गीय/आर्थिक दुर्बल घटक यांना ५ वर्ष शिथीलक्षम) |
| ९ | शिकाऊ उमेदवारीकरिता अर्ज भरावयाची अंतिम तारीख | :- | दि. २०/०७/२०२२ (वेळ २३:५९) पर्यंतचे अर्ज |
| १० | उमेदवारांनी घ्यावयाच्या काळजीबाबत | १ | उमेदवारांने आपला प्रोफाईल तपासुन घेण्याची जबाबदारी स्वत: उमेदवारांची असेल. |
| | | २ | ऑनलाईन अर्ज सादर करतांना एस. एस .सी व आय. टी. आय वीजतंत्री उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नांव हे आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करुन माहिती भरावी |
| | | ३ | एस. एस. सी गुणपत्रक/प्रमाणपत्र आ . टी. आय उत्तीर्ण सर्व सत्रांचे गुणपत्रक/प्रमाणपत्र (चारही सेमिस्टरची) स्वसाक्षांकित प्रत ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज केला असेल तर मागासवर्ग प्रवर्गात जात प्रमाणपत्र तसेच आर्थिक दुर्बल घटक (EWS) मधुन अर्ज केला तर त्याबाबतचे (EWS) प्रमाणपत्र www.apprenticeshipindia वर अपलोड करणे बंधनकारक आहे. तसेच सोबत जोडलेल्या विहीत फॉर्मचा Screen Short / Print आवश्यक दस्ताऐवज सोबत सादर करणे बंधनकारक आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ४ | शिकाऊ उमेदवारांची सही, प्रवर्ग, जन्मतारीख, एस. एस. सी.गुण, आय. टी. आय चे गुण यांची माहिती अचुक भरण्यात यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. |
| | | ५ | शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडुन दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करणेत येईल यांची नोंद घ्यावी. |
| | | ६ | शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करतांना पोर्टलवर स्वत:चा फोटो, मुळ प्रमाणपत्रांच्या सुस्पष्ट स्कॅन केलेल्या प्रती सादर कराव्यात व टपालाव्दारे पाठविण्यात येणारा फॉर्म व दस्ताऐवजातील फोटो सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी |
| | | ७ | प्रत्येक उमेदवाराची वर्तणुक चांगली व शिस्तप्रिय असणे आवश्यक आहे. याबाबत कोणतीही गैरवर्तणुक केल्यास शिकाऊ कायदा १९६१ मधील १७ अन्वये ते शिक्षेस पात्र ठरतील. |
| | | ८ | प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ३०० गुणांची (६ तास अवधीची)परिक्षा उमेदवाराने देणे अनिवार्य राहील. जो उमेदवार प्रशिक्षण कालावधी पुर्ण करेल तोच उमेदवार परिक्षेस बसण्यास पात्र असेल. |
| ११ | एकाच उमेदवाराने खालील विभागीय कार्यालयास एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास<br>१) अउदा संवसु विभाग,अकोला<br>२) अउदा संवसु विभाग, बुलडाणा<br>३) ४०० आर .एस. के. व्ही. विभाग, अकोला | :- | एकाच उमेदवाराने अउदा संवसु मंडळ, कार्यालय अकोला या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणा-या तसेच समोर नमुद विभागीय आस्थपना कार्यालयात प्रत्येकी एका पेक्षा जास्त ठिकाणी अर्ज केल्यास व त्या उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड एकापेक्षा जास्त कार्यालयात होत असल्यास अशा उमेदवारांची निवड त्याने टपालाव्दारे पाठविलेल्या फॉर्म मध्ये नमुद पत्ता, ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येतो किंवा नजीक आहे त्या एकाच ठिकाणी त्यांची निवड करण्यात येईल आणि ते अंतिम असेल यांची कृपया नोंद घ्यावी. प्रत्येक फॉर्मवर वेगवेगळे पत्ते नमुद केल्यास फॉर्मवरील व आधारकार्ड वरील पत्ता विचारात घेण्यात येईल. |
| १२ | अचुक माहिती भरणे | :- | उमेदवारांनी आपली माहिती अचुकपणे विहीत फॉर्म मध्ये भरावी कारण त्यात नमुद माहिती आधारे निवड यादी बनविण्यात येणार असुन त्यात पुन्हा बदल करता येणार नाही. निवड यादीत नमुद उमेदवारांचीच फक्त कागदपत्रे निवड झाल्यानंतर पडताळण्यात येतील. पडताळणी अंती अपात्र ठरल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांचा विचार केला जाईल. फॉर्म मधील चूकीच्या भरलेल्या माहितीमुळे निवड झाली नाही तर त्यास संपुर्णपणे उमेदवार स्वत:जबाबदार राहील. |
| १३ | इतर संबंधित माहिती | :- | सदर शिकाऊ भरतीमध्ये अंशत: बदल किंवा संपुर्ण रद्य करण्याचे अधिकारी हे कंपनी राखुन ठेवत आहे. सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. तसेच सदर बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही यांची नोंद घ्यावी. |
| १४ | निवड यादी | :- | www.mahatransco.in. या संकेतस्थळावर Career या सदरा खाली प्रसिध्द करण्यात येईल. |
| १५ | मदतीसाठी संपर्क | :- | मानव संसाधन विभाग प्रमुखांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९८८१६३८१७५ (फक्त कार्यालयीन वेळेत) |

(सही)

(विनोद न. हंबर्डे)
कार्यकारी अभियंता,
अउदा संवसु विभाग,बुलडाणा

म. रा. वि. पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, बुलडाणा या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरुन करावयाचा अर्ज.

उमेदवाराने अलिकडे काडलेला पासपोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी. (स्टेपल किंवा पीन लावु नये

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नांव | : | ________ (आडनांव) ________ (उमेदवाराचे नांव) ________ (वडिलांचे/पतीचे नांव) |
| २ | उमेदवाराच्या वडिलांचे पुर्ण नांव | : | ________ (आडनांव) ________ (वडिलाचे नांव) ________ (आजोबांचे नांव) |
| ३ | लिंग व वैवाहिक स्थिती | : | ________ (स्त्री) Female ________ (पुरुष) Male ________ (विवाहीत) Married ________ (अविवाहीत) Unmarried |
| ४ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | : | ________<br>________<br>________<br>पिन कोड |
| ५ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | : | ________<br>________<br>________<br>पिन कोड |
| ६ | दुरध्वनी /मोबाईल क्र. | : | ________ कोड—दुरध्वनी क्र. ________ मोबाईल क्र. |
| ७ | ई—मेल आयडी | : | |
| ८ | जन्म दिनांक | : | दिनांक / महिना / वर्ष |
| ९ | जात व जातीचा प्रवर्ग (लागु असलेल्या ठिकाणी अशी खुण करावी ) ✓ | : | जात :—————— |

| अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | ईमाव | ई.डब्लु. एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | अ) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका—यांचा जातीचा दाखला जोडला आहे का? : | | होय yes<br>नाही No |
| | ब) महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम जात पडताळणी समितीने वैद्य केलेले जात वैद्यता प्रमाणपत्र जोडले आहे का? : | | होय yes<br>नाही No |
| | क) उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non creamy layer) जोडले आहे का? ( SC, ST सोडुन) : | | होय yes<br>नाही No |
| | ख) आर्थिक दृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे का? | | होय yes<br>नाही No |
| ११ | १) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय? : | | होय yes<br>नाही No |
| | २) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे प्रमाणपत्र (Domicile) जोडले आहे का? : | | होय yes<br>नाही No |

| १२ | शैक्षणिक पात्रता :— (प्रमाणपत्र साक्षांकित प्रती जोडाव्यात) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र | परिक्षेचे नांव | शाळा/मंडळ/ विद्यापीठ/संस्थेचे नांव | परिक्षा उत्तीर्ण | मिळालेले एकुण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
| १ | एस. एस. सी. (१० वी) | | | | | |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसास प्रशिक्षण परिषद (NCTV)उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र | | | | | |

## प्रतिज्ञापत्र

१) मी असे प्रमाणित करतो/करते की, म. रा. वि. पा. कंपनी मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, बुलडाणा यांच्या कार्यालयाने प्रस्तुत दिलेली जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी, संपुर्ण व योग्य असुन ती चुकीची वा खोटी आढळुन आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील, याची मला पुर्णपणे जाणिव आहे. मी सादर केलेली कोणतीही माहिती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर खोटी अथवा बनावट आढळुन आल्यास मला निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

२) मी असेही प्रमाणित करतो/करते की, माझी निवड झाल्यास मी विभागाच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी रुजु होण्यास तयार आहे.

३) मी असे प्रमाणित करतो की, जाहिरातीत केलेल्या अटी, शर्ती व निवडप्रक्रिया मला मान्य राहतील.

**स्थळ :—**

**दिनांक :—**

**उमेदवाराची स्वाक्षरी**